# चाळीसगांव नगरपरिषद चाळीसगांव जि.जळगांव

☎ - (०२५८९)२२३४१६ फॅक्स नं. - ०२५८९-२२३३९७ ई.मेल - chalisgaonnp@gmail.com

************************************************************

न.पा./बांध-२/१८९ /२०१७ दिनांक-०५/०५ /२०१७

प्रति,

सेक्रेटरी/चेअरमन
महाराणा प्रताप सहकारी गृह निर्माण सोसायटी लि
चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव

विषय :-- मौजे चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव येथील स.नं.३५३/ब/३५५/क/३५६/ब ३५८/ब३४९/अ२/३५४/ब/३५९ /ब (एकूण क्षेत्र २४७५५.००चौ.मी.)मधील जमिनीवर रहिवास प्रयोजनार्थ सिमांकित (Demarketed) अभिन्यांसास अंतिम मंजुरीबाबत.

संदर्भ :-- १) मा.सहाय्यक संचालक,नगररचना,जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र.तात्पु/अभि/मौजे चाळीसगांव स.नं.३५३/ब/३५५/क/३५६/ब ३५८/ब३४९/अ२/३५४/ब/३५९ /ब /ससं-जळ/ ११३६/दि.२/४/२०१४

२) नगरपरिषदेकडील तात्पुरता मंजुरीबाबत पत्र क्र.३८१ दि.१९/८/२०१४

३)म.जिल्हाधिकारी सो,जळगांव यांचेकडील आदेश क्र.जमिन /२/ २६/बिशे/एसआर /५७ /२०१५ दि.४/८/२०१६

४) म.उपअधिक्षक,भुमी अभिलेख कार्यालय,चाळीसगांव यांचे दि.१०/८/२०१६चा मोजणी नकाशा

५) मा.सहाय्यक संचालक,नगररचना,जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र.सिमां/अभि/मौजे ४०गांव स.नं.३५३/ब/३५५/क/३५६/ब ३५८/ब३४९/अ२/३५४/ब/३५९ /ब /ससं-जळ/६५२ / दि.२९/३/२०१७

महोदय,

वरील विषयांन्वये मौजे चाळीसगांव तालुका चाळीसगांव जि.जळगांव येथील स.नं.३५३/ब/ ३५५/क/ ३५६/ब ३५८/ब३४९/अ२/३५४/ब/३५९ /ब एकूण क्षेत्र २४७५५.००चौ.मी.)मधील जमिनीवर रहिवास प्रयोजनार्थ सिमांकित (Demarketed)अभिन्यांसास म.सहा.संचालक,नगररचना,जळगांव यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्र.सिमां. अभि. /मौजे.चाळीसगांव ता.चाळीसगांव मा.सहाय्यक संचालक,नगररचना,जळगांव यांचेकडील पत्र जा.क्र.सिमां/अभि/मौजे चाळीसगांव स.नं.३५३/ब/३५५/क/३५६/ब ३५८/ब३४९/अ२/३५४/ब/३५९ /ब /ससं- जळ/६५२/दि.२९/३/२०१७ अन्वये मंजुरीसाठी शिफारस केलेली आहे.त्यानुसार सदर अभिन्यांसास खालीलप्रमाणे अटी व शर्तीनुसार रहिवास प्रयोजनार्थ सिमांकित अभिन्यांसास (Demarketed) अंतिम मंजुरी देण्यांत येत आहे.

**अटी व शर्ती** :--

१)अभिन्यासातील सर्व भूखंड रहिवास प्रयोजनार्थ वापरण्यांत यावेत.

२)प्रत्यक्ष जागेवर सिमांकन केलेल्या अभिन्यासातील भुखंडाचे क्षेत्र विकास नियत्रण नियमावलीतील अनुज्ञेय क्षेत्राप्रमाणे असणे आवश्यक आहे.

३) अभिन्यासाखालील जमिनीलगत महसूल स्तरावर पूर्वी बिनशेती मंजुरी दिलेली असल्यास त्यातील पोच रस्त्यांशी योग्य तो समन्वय साधणे आपणांस बंधनकारक राहील.

४) अभिन्यासातील सर्व रस्ते सभोवतालच्या जमीन मालकांना जर ते त्यांची जमीन विकसित करणार असतील तर पोहोच रस्त्यासाठी वापरु देण्यांत यावे.

**४) अभिन्यासातून विकास योजना रस्ता (१२ मी./१५मी./१८मी./२४मी.डी.पी.रोड) जात असल्यास त्याबद्दल कोणताही मोबदला आपणांस मिळणार नाही..**

५) अभिन्यासातील कुठलाही भूखंडाचे सक्षम अधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय एकत्रिकरण व विभाजन करता येणार नाही.

६) अभिन्यासातील नकाशात दर्शविलेले रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग /नियोजन प्राधिकरणाचे निर्देशाप्रमाणे विकासीत करुन नगरपरिषदेच्या ताब्यात पुढील देखभालीसाठी नाममात्र रुपये १/- या शुल्कावर हस्तांतरीत करुन दयावेत.

७) खुल्या जागेचे एकूण क्षेत्र एकूण रेखांकनातील क्षेत्राच्या १०% इतके क्षेत्र किमान राहीले पाहिजे व ती जागा कायम खुली ठेवण्यांत आली पाहिजे.खुली जागा म्हणून निर्देश केलेला भुखंड नगरपरिषदेकडे नाममात्र रु.१/- शुल्कावर व्यवस्थापन करण्याकरिता सुपूर्द करण्यांत यावा व तो भूखंड खुली जागा किंवा क्रिडांगण म्हणून उपयोगात आणावा.त्यावर कोणत्याही प्रकारचे बांधकाम नगरपरिषदेच्या परवानगीशिवाय करता येणार नाही.

८)अभिन्यासातील रस्ते,गटार, व खुल्या जागेस कुंपण व पाणीपुरवठा पाईप लाईन व इले.पोल इ. कामे झालेले आहे अभिन्यासातील खुल्या जागेवर कुठलेही बांधकाम अनुज्ञेय नाही.तसेच सदरहू खुली जागा व अंतर्गत रस्ते स्थानिक नगरपालिकेच्या नांवे करुन देणेबाबत १०० रु.च्या स्टॅम्पवर हमीपत्र करुन दिलेले आहे.सदर अभिन्यांसातील ओपनस्पेस व रस्ते नगरपरिषदेच्या नावे न केल्यास आपल्या सिमांकित अभिन्यांसाची मंजुरी रद्द करण्यांत येईल व त्यांस आपण स्वतः जबाबदार राहाल यांची नोंद घ्यावी.

९) प्रत्येक भुखंडातील बांधकाम हे शासनाने "अ" "ब" व "क" वर्ग नगरपरिषदांना लागू केलेल्या प्रमाणीत इमारत उपविधी व विकास नियत्रण नियमावलीनुसार असावे.व त्याकरिता नगरपरिषदेची पूर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

१०)अभिन्यासातील भूखंडाना पाणीपुरवठा करण्याची जबाबदारी जागा मालकाची असुन त्यांनी सांडपाण्याच्या निच-याची सुध्दा योग्य ती काळजी घ्यावयाची आहे.

११)सदरहू जागेतील सध्या अस्तित्वात असलेली झाडे विना परवानगीने तोडू नये.

१२)सदर अभिन्यासास तांत्रिक मंजुरीची शिफारस आपण सादर केलेल्या भूमी अभिलेख यांचेकडील मोजणी नकाशा व ७/१२ उता-यानुसारचे क्षेत्र ग्राहय धरण्यांत आलेली आहे.

१३)सदरहू जागेत जर उच्चदाब विद्यूत वाहीनी अस्तित्वात असेल तर ती जागा मालकाने स्वखर्चाने अभिन्यासातील रस्त्यानुसार स्थानांतरीत करुन घ्यावी.

१४) सदर सिमांकित अभिन्यासात नकाशात दर्शविलेला सुविधा भूखंड (AMinity Space) चे क्षेत्र १२४२.७१ चौ.मी.चा स्वतत्र ७/१२ उतारा सुविधा भूखंड (AMinity Space) म्हणून तयार करुन नगरपरिषदेस सादर करणे आपणांस बंधनकारक राहील.

१५)सदरहू प्रकरणात,अभिन्यास मंजुरीची शिफारस करतांना अर्जदाराने प्रकरणासोबत दाखल केलेली मालकी हक्काचे कागदपत्रे व मोजणी नकाशा इत्यादी कागदपत्रे ग्राहय धरण्यांत आलेली आहे.सदर कागदपत्रे भविष्यात दिशाभूल करणारी आढळून आल्यास सदर अभिन्यास रद्द समजण्यांत येईल.

वरील पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन झाल्यास महाराष्ट्र नगरपालिका,नगरपचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १८९ व म.प्रा व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ४४,४५ व ५१ नुसार कार्यवाही करण्यांत येईल याची नोंद घ्यावी. लेआऊटवरील विकास शुल्क रक्कम रुपये १६१४२७/- मात्र पा.क्र.९७८ दि.८/७/२०१७ नुसार नगरपरिषदेत रोख भरणा केलेला आहे. वैयक्तिक प्लॉटधारकांस प्लॉट वरील विकास शुल्क भरणेस प्लॉटधारकास सुचित करावे.

वरीलप्रमाणे अटी व शतीचे पालन न केल्यास अभिन्यासांची अंतिम मंजुरी रदद करण्यांत येईल

मुख्याधिकारी
नगरपरिषद,चाळीसगांव

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी .
१)म.जिल्हाधिकारी सो,जळगांव
२)म.सहा.संचालक,नगर रचना,जळगांव
३) म.तहसिलदार सो,तहसिल कार्यालय,जळगांव
४)म.तालुका निरिक्षक,भूमी अभिलेख,चाळीसगांव